Journal of Research & Development
Vol. 5 (Issue. 04), July-August, 2015
(ISSN-2230-9578)

सविनय कायदेभंग चळवळीत यावल तालुक्याचे योगदान

प्रा. दिनेश रामदास महाजन
इतिहास विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद ता.यावल जि.जळगाव
email-dineshr.m@rediffmail.com

प्रास्ताविक :-

लाहोर काँग्रेस अधिवेशनानंतर महात्मा गांधींनी कायदेभंग चळवळीची आखणी केली. मीठ हे सर्वसामान्य माणसाला जीवनावश्यक वस्तु असल्याने, मीठ परमेश्वराने सृष्टीत निर्माण केलेल्या व समुद्राच्या पाण्यापासुन सुर्याच्या उष्णतेने वाफ होवून नैसर्गिकरित्या तयार होते. अशा वस्तुवर कर लादणे अन्यायाचे आहे म्हणुन या अन्यायी कायद्याविरुध्द महात्मा गांधींनी कायदेभंग चळवळ करण्याचे निश्चित केले. `कर न देता मीठ तयार करावयाचे व ते जाहीररित्या विकायचे` असे या कायदेभंगाचे स्वरुप होते. आपण हा अन्यायी कायदा मोडणार आहोत असे महात्मा गांधींनी आपल्या `यंग इंडिया` पत्रात जाहीर केले व त्यासाठी कायदेभंगात भाग घेवु इच्छिणाऱ्या स्वयंसेवकांना आपल्या संकल्पित दांडी यात्रेत सामील होण्याचे जाहीर आवाहन केले.

महात्मा गांधींच्या आवाहनाप्रमाणे जळगाव जिल्हयात सविनय कायदेभंग चळवळीला जनतेचा उत्स्फुर्त पाठींबा मिळाला. जिल्हयातील यावल तालुक्यातही सविनय कायदेभंग चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचली. सविनय कायदेभंग चळवळ ही केवळ शहरांपुरतीच मर्यादीत राहीली नाही तर छोटया-छोटया खेडयांपर्यंत पोहोचलेली दिसुन येते. यावल तालुक्यातील भालोद, न्हावी यासारख्या लहान लहान गावांमध्ये देखील सभा, बैठका, प्रभाव फेऱ्या झाल्याचे गुप्तचरांच्या अहवालांमध्ये नोंदी मिळतात. तर यावल, फैजपुर सारख्या शहरांमध्ये भाषणे, सभा, प्रभात फेऱ्या, निदर्शने, सरकारी कृत्याचा निषेध, शाळा व सरकारी इमारतींवर ध्वजारोहन अशा प्रकारचे उपक्रम चालु असल्याच्या नोंदी पोलिसांच्या गोपनीय अहवालांमध्ये मिळतात.

जळगाव जिल्हयाचे काँग्रेसचे वरिष्ठ नेते वासुदेव दास्ताने तुरुंगात असताना त्यांच्या पत्नी सौ.वारुताई यांनी त्यांची पोकळी भरुन काढली. सौ.वारुताई दास्ताने, सौ.पार्वतीबाई ठकार व पुण्याच्या सत्याभामाबाई कुवळेकर यांनी यावल, फैजपुर, सावदा, जळगाव, भुसावळ, वरणगाव, एदलाबाद (मुक्ताईनगर), चांगदेव, अमळनेर, वगैरे ठिकाणी स्त्रियांच्या सभा घेवून सत्याग्रहासाठी पोषक वातावरण निर्मिती केली.

या चळवळीत भालोद सारख्या छोटयाशा खेडयातुनही मोठा प्रतिसाद मिळाला. मुरारी रामजी चौधरी व रामदास पुरुषोत्तम चौधरी यांनीही सविनय कायदेभंग चळवळीत सभा व मिरवणुकात भाग घेतला. त्याबद्दल त्यांना अटक होऊन तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा आणि २५ रु.दंड झाला.

सा.प्रबोधचंद्रिकेच्या वृत्तानुसार, यावल, जळगाव, भुसावळ, पिंप्राळे, चाळीसगाव, रावेर इ.गावांमध्ये रोज प्रभात फेऱ्यांचा क्रम चालु असल्याचे दिसुन येते.

साने गुरुजी मीठाच्या सत्याग्रहासाठी शिरोडा येथे गेले होते. पंरतु त्यांना कायदेभंगाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी, निधी मिळविण्यासाठी व सत्याग्रहासाठी जास्तीत जास्त स्वयंसेवक गोळा करण्याची जबाबदारी सोपवून जळगाव जिल्हयात वापस पाठविण्यात आले. त्यावेळी साने गुरुजींनी जळगाव जिल्हयातील विविध गावांबरोबरच यावल तालुक्यातील फैजपुर, यावल इ. गावांमध्ये जावुन व्याख्याने दिली. यावेळी लोक पैसे व दागीनेही अंगावरुन काढुन देत असत.

साने गुरुजींची फैजपुरला झालेली सभा ही त्यांच्या राष्ट्रीय चळवळीतले पहिले व्याख्यान होते. त्यानंतर थोरगव्हाणची सभा आटोपुन साने गुरुजी यावलला आले. ठिकठिकाणी स्वयंसेवकांची नोंद होत होती. परंतु आर्थिक सहाय्याची ते याचना करत नव्हते. परंतु याबद्दलही लोकांना आवाहन करुन मदत मिळवावी असा आश्रमाकडुन निरोप आला. साने गुरुजींचा स्वभाव संकोची होता. पैसे कसे मागायचे आणि कोण आपल्याला पैसे देणार असे त्यांना वाटत असे. परंतु यावलच्या सभेत त्यांनी प्रयोग करुन पाहायचे ठरविले. सभेत सुरुवातीला त्यांनी राष्ट्रीय गीते म्हटली. त्यांचे भाषण ओजस्वी झाले. भाषणाच्या शेवटी गुरुजींनी लोकांना लढयासाठी मदतीचे आवाहन केले आणि त्यांनाच आश्चर्य वाटले. लोकांनी पैसे तर दिलेच, परंतु हातातल्या अंगठयाही काढुल दिल्या. एका पित्याने तर आपल्या मुलाच्या हातातले सोन्याचे कडे काढुन दिले. गुरुजींना हा अनुभव वेगळा होता. गुरुजींचे ऱ्हदय भरुन आले, त्यांचा आत्मविश्वास वाढला.

नागपुर येथील वरिष्ठ कामगार पुढारी रामभाऊ रुईकर यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात जळगाव जिल्हयात अनेक सभा घेतल्या. त्यापैकी फैजपुर येथे झालेल्या त्यांच्या सभेने सरकारचा बराच रोष ओढवुन घेतला होता. सभेत रुईकरांनी रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी खादीचा गणवेश करण्याबाबतचा ठराव पास केला होता. १९३० मध्ये ही मागणी अभिनव स्वरुपाची होती.

धनाजी नाना चौधरी यांनी महात्मा गांधींच्या आवाहनानुसार १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत पोलीस खात्यातील फौजदार पदाची नोकरी सोडून खिरोदा येथे आश्रम काढला. तेथे चरखा, खादी आणि हरिजन सेवा इ.गांधी प्रणीत विधायक कामाला धनाजी नाना चौधरी यांनी वाहून घेतले. यावल तालुक्यातील भालोद येथील न्यू इंग्लिश स्कूल शाळेतील शिक्षक मोतीराम ओकार चौधरी या राष्ट्रवादी विचारांच्या शिक्षकांवरही महात्मा गांधींच्या आवाहनाचा व धनाजी नानांच्या आदर्शाचा प्रभाव पडून त्यांनी शिक्षक पदाची नोकरी सोडली व ते खिरोदा येथे आश्रमात राहून धनाजी नानांच्या कार्यात सहभागी झाले. ब्रिटीश विरोधी कारवायांमध्ये १९३२ मध्ये मोतीराम ओंकार चौधरींना अटक होऊन धुळयाच्या तुरुंगात पाठविण्यात आले. तुरुंगात त्यांना साने गुरुजी, विनोबा भावे, जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंदा, धनाजी नाना चौधरी व बाळूभाई मेहता इ. वरिष्ठ नेत्यांचा सहवास लाभला.

महात्मा गांधींना ब्रिटीश सरकारने अटक केल्याने सविनय कायदेभंग चळवळ पुढे नेटाने चालविण्यासाठी व या कार्यास हातभार लावण्याचे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे आसोदा येथील देशभक्त द.ग.काळे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटलेले दिसुन येते. त्यांनी बामणोद, यावल, नेरी, एरंडोल या भागात मिठाचा व जप्त झालेले राजद्रोही वाङमय वाचुन कायदेभंग करणार असल्याचे प्रसिध्दी प्रत्रकात म्हटलेले दिसुन येते.

द.ग.काळे यांनी जाहीर केल्याप्रमाणे यावल नशिराबाद, शिरसोली, म्हसावद, माहीजी, मुमराबाद, एरंडोल, धरणगाव, चोपडे, येथे व्याख्याने देवून बरीच जागृती केली व काँग्रेस सभासद वाढविलेले दिसुन येतात.

सविनय कायदेभंग चळवळ गतिशिल करण्यासाठी व जनतेत उत्साह निर्माण करण्यासाठी यावल काँग्रेस कमिटीची स्थापना व निवडणुक घेण्यासाठी १३ मे १९३१ रोजी दु.४ वा. फैजपुर येथे वि.रा.जोशी यांच्या घरी सभा आयोजित करण्यात आल्याचे व सर्व सभासदांनी अवश्य येण्याचे करावे. तसेच नखशिखांत खादी वापरणाऱ्यांनाच मत देता येईल असे जिल्हा काँग्रेस कमिटीचे चिटणीस वि.वा.बोचरे यांनी कळविलेले दिसुन येते.

महात्मा गांधींच्या जयंती निमित्त यावल येथील उत्साही वकिल मंडळींनी ५०० रु.ची खादी आणली होती परंतु ती दोन दिवसातच विकली गेली. यावल येथे महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी `तकली सप्ताह` साजरा करण्यात आला. त्यात नर्मदाबाई भास्करकोटी, सौ.रमाबाई कोटीभास्कर, सौ.लक्ष्मीबाई जोशी यांनी प्रामुख्याने भाग घेवुन १०००० वार सुताचा संकल्प केलेला दिसुन येतो.

महात्मा गांधीच्या सुचनेनुसार, समुद्र किनारा नसलेल्या प्रांतात जंगल सत्याग्रहाद्वारे सविनय कायदेभंग करण्यात आला. मान्सुनच्या आगमनानंतर मिठाऐवजी वनविषयक कायदेभंग, ताडीच्या झाडांची तोड, दारुच्या आणि विलायती कापडाच्या दुकानांसमोर निरोधने इ.स्वरुपात कायदेभंग आंदोलनाचा जोर वाढला. जुलै १९३० पासून जंगल सत्याग्रह अधिकच व्यापक करण्यात आला.

महाराष्ट्र काँग्रेस युध्द मंडळाने जंगल सत्याग्रहाचा प्रारंभ केल्यावर जळगाव जिल्ह्यात यावल, चोपडा आणि रावेर तालुक्यांना जंगल सत्याग्रह करण्यास संमती देण्यात आली. त्याप्रमाणे चोपडे तालुक्यात अकुलखेडे येथे`जंगल सत्याग्रह कार्यालय` उघडून प्रचार कार्य सुरू करण्यात आले.

यावल तालुक्यातील पडसझिरी पहाडातुन चार लोकांनी विना (पासने) परवानगीने अंजनाची लाकडे, पाला व गवत डोक्यावर वाहुन आणले म्हणून त्यांच्यावर पोलिसांनी सरकारात खटला देवून प्रत्येकी तीन लोकांना तीन महिने सक्तमजुरी व २५ रु. दंड याप्रमाणे शिक्षा देण्यात आली. चौथ्या व्यक्तीने माफी मागितल्यामुळे त्यास जामीनावर सोडून देण्यात आले.

महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल व सुभाषचंद्र बोस या पुढाऱ्यांना अटक केल्याचे वृत्त समजताच यावल येथे ५ जानेवारी १९३२ रोजी महात्मा गांधी व सरदार पटेल यांच्या अटकेच्या निषेधार्थ हरताळ पाळण्यात आला. तसेच यावल तालुक्यातील फैजपुर येथेही ५ जानेवारी रोजी हरताळ पाळण्यात येवून रात्री अनंत हरी गंद्रे यांचे महात्मा गांधीजींचे अभिनंद करणारे जाहीर व्याख्यान झाले. जनतेने अशा स्थितीत कसे वागावे यासंबंधी त्यांनी मार्गदर्शन केले.

यावल तालुका काँग्रेस कमिटी तहकुब करुन तिचे अधिकार ५ जानेवारी १९३२ रोजी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वि.वा.बोचरे यांना देण्यात आले होते. परंतु त्यांना अटक झाल्याने त्यांच्या नंतर डिक्टेटर लोटु इच्छाराम यांना नेमण्यात आले होते. त्यांचे १७ जानेवारी १९३२ रोजी रात्री यावलच्या गांधी चौकात व्याख्यान झाले. दुसऱ्या दिवशी त्यांच्यावर पकड वारंट बजावून अटक करण्यात आली. त्यानंतर वामन विठु भारंबे यांनाही अटक करण्यात आली. तसेच १२ जानेवारी रोजी खिरोद्याचे माजी फौजदार धनाजी नाना चौधरी व मोतीराम ओंकार चौधरी या दोघांना भालोद मुक्कामी व्याख्यान दिल्यामुळे अटक करण्यात आली.

न्हावी येथील दुना भिकारी महाजन यांना २४ जानेवारी १९३२ रोजी इमर्जन्सी ॲक्टखाली अटक करण्यात आली. त्यामुळे २५ जानेवारी सोमवार रोजी आठवडे बाजार असुनही कडक हरताळ पाडण्यात आला. त्यामुळे बाजार भरलाच नाही. २६ जानेवारी रोजी न्हावी येथे शंकर वासुदेव कुलकर्णी, नारायण जयराम महाजन, डिगंबर ओंकार, भगवान रावजी पाटील, कौतीक दामु भंगाळे या व्यक्तींना अटक करण्यात आली. २८ जानेवारी १९३२ रोजी फैजपुर येथील तालुका काँग्रेस कमिटीचे दुसरे डिक्टेटर पकडले गेल्यामुळे

त्यांच्यानंतर तिसरे डिक्टेटर दत्तात्रय वासुदेव कुलकर्णी यांना सातोद येथे अटक करण्यात आली. त्यांच्यासोबत इच्छाराम चांगो यांनाही अटक करण्यात आली.

पूर्वखानदेश कलेक्टरच्या गोपनीय पत्रानुसार, जिल्हयात ११० लोकांना अटक करण्यात आली असुन यावल, पाचोरा व चोपडा येथे सहा पेक्षा अधिक लोकांना अटक करण्यात आली अशा प्रकारचे वृत्त दिसुन येते.

संपुर्ण जिल्हयात यावल, रावेर, चोपडा, पाचोरा याठिकाणी छोटी मोठी निदर्शने सुरु होती. यात १३ लोकांना अटक करण्यात आली. त्यांनी गुन्हा कबुल केला म्हणून त्यांना अटक झालेल्यांना दोषी ठरवुन शिक्षा देण्यात आल्या. यातील काहींनी माफी मागीतली परंतु कोणालाही माफ करण्यात आले नाही.

सविनय कायदेभंगाच्या काळात स्वदेशीला चालणा मिळावी यासाठी यावल येथील वकिल मंडळींसाठी गोविंदराव कोरान्ने वकिल यांनी मुंबई येथुन ५०० रु.ची खादी आणली व ती मुंबईच्याच भावाने विकली.

फैजपूर येथे तीन व्यक्तींनी प्रभात फेरी काढली त्यांच्या हातात काँग्रेसचे झेंडे होते असा या यांच्यावर आरोप होता. लोकांना वाटप करण्यासाठी त्यांच्या जवळ पत्रके जोती. त्यांना अटक करण्यात येवून पूर्वखानदेशच्या दंडाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आले.

निष्कर्ष :-

महात्मा गांधीच्या सविनय कायदेभंग चळवळीत यावल तालुक्यातील हजारो लोकांनी उत्स्फुर्त पाठींबा दिलेला दिसुन येतो व अनेकांनी तुरुंगवास भोगलेला दिसुन येतो. महात्मा गांधींनी केलेल्या आवाहनाप्रमाणे यावल तालुक्यातील लोकांनी प्रत्येक गोष्टीचे पालक केलेले दिसुन येते. तालुक्यात रोज प्रभात फेऱ्या निघत होत्या, निषेध मोर्चे, निषेध सभा आयोजित केल्या जात होत्या. स्वदेशीला चालणा देण्यासाठी खादीची मोठया प्रमाणात विक्री होत होती. सरकारी कृत्यांचा निषेध केला जात होता. पावसाळा सुरु झाल्यावर झाड, गवत व पाला तोडुन जंगल कायदा तोडला जात होता. यावरुन असे लक्षात येते की, यावल तालुक्यातील जनता ही नेहमीच राष्ट्रीय चळवळींमध्ये सक्रिय असलेली दिसुन येते.

संदर्भ ग्रंथ :-

१ चौधरी कि.का. (संपादक), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, जळगाव जिल्हा, मुंबई, १९९४, पृ.१२५, १२६

२ कंटक प्रेमा, सत्याग्रही महाराष्ट्र, पुणे, १९४०, पृ.२८४

३ कुंटे भ.ग., स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, महाराष्ट्र राज्य, पश्चिम महाराष्ट्र, खंड-१, मुंबई, १९७९, पृ.२२०

४ सा.प्रबोधचंद्रिका २९ सप्टेंबर १९३०, पृ.०५

५ भोगे रामभाऊ, जळगाव जिल्हयातील स्वातंत्र्य लढयाच्या गतइतिहासाचे सिंहावलोकन, जळगाव, १९८८, पृ.१९,२०

६ मंगळवेढेकर राजा, साने गुरुजींची जीवनगाथा, पुणे, १९७५, पृ.१५४, १५५

७ चौधरी के.के., जळगाव जिल्हयातील स्वातंत्र्य लढा, मुंबई, १९९७, पृ.६६, ६७

८ मंगळवेढेकर राजा, साने गुरुजींची जिवनगाथा, पुणे, २०००, पृ.२१२

९ सा.प्रबोधचंद्रिका,जळगाव, २६ मे १९३०, पृ.०६

१० सा.प्रबोध, धुळे, ३ मे १९३१ पृ.०३

११ सा.प्रबोधचंद्रिका,जळगाव, ११ मे १९३१, पृ.०६

१२ सा.प्रागतिक, जळगाव, १९ ऑक्टोंबर १९३१, पृ.०३

१३ संपादक, फैजपुर काँग्रेस सुवर्ण महोत्सव गौरव ग्रंथ फैजपूर, १९८७, पृ.२८

१४ भोगे रामभाऊ, जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढयाच्या गत इतिहासाचे सिंहावलोकन, जळगाव, 1988, पृ.२८

१५ प्रबोधचंद्रिका, ११ ऑगस्ट १९३० पृ.५

१६ सा.प्रागतिक, ११ जानेवारी १९३२, पृ.०३

१७ सा.प्रागतिक, जळगाव, १८ जानेवारी १९३२, पृ.०२

१८ सा.प्रागतिक, जळगाव, १ फेब्रुवारी १९३२, पृ.०२

१९ Home Dept. File No. ८०० (७४)(१०) १९३२-३४, Dated २१ Jan.१९३२

२० ८०० (७४) (१०) १९३२-३४ date १४ जाने.१९३२

२१ सा.प्रागतिक, जळगाव, १७ ऑक्टोंबर १९३२, पृ.०३

२२ Home Dept. File No Date १९ April १९३४